दैनिक महाराष्ट्र www.esuryodaylive.com Email : suryodaykokan.123@gmail.com

# सूर्योदय

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे  अनुप फंड (आवृत्ती संपादक),
निखिल गोळे (आवृत्ती सहसंपादक),नयनिश गोळे (आवृत्ती कार्यकारी संपादक)

24 तास सेवा ॥ श्री नागनाथ कृपा ॥ प्रो.प्रा.यमपुरे अशोक 8014842121
सूर्योदय मेडिकल & जनरल स्टोअर्स
CHEMIST & DRUGIST
शुगर,बीपी,थायरॉड,अस्थमा तसेच मुंबई,पुणे,औरंगाबाद, लातूर,बार्शी,सोलापूर,नगर येथील मेडिसिन मिळेल
सर्व प्रकारचे मेडिसिन घरपोच मिळतील
मन्मथस्वामी चौक,पाटोदा रोड,मांजरसुंबा ता.जि.बीड

मुंबई || वर्ष २२ || अंक २२१ || गुरूवार २५ जुलै २०२४ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||

# मुसळधार पावसामुळे पाचबत्ती नाक्याजवळ मुख्यरस्ता खचला.

पालघर : दिनेश आंबेकर

जव्हार तालुक्यातील ग्रामीण भागात गेल्या दोन दिवसांपासून मुसळधार पावसाने जोर धरला आहे. त्यामुळे या भागातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. सोमवारी रात्री ते मंगळवारी पहाटेपर्यंत झालेल्या जोरदार मुसळधार पावसामुळे जव्हार शहरातील पाचबत्ती नाक्याजवळील मुख्य रस्ता हा १०० फुटापर्यंत खचला असून सुदैवाने येथे जीवित हानी झाली नाही.शहरातील मुख्य ठिकाण अस-लेला पाचबत्ती नाक्यावर अनेक वर्षभरापासून रस्त्याला तडे गेले होते, यावर वेळीच उपाय योजना करण्यात आली नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. शिवाय या रस्त्याला कोट्यवधी रुपये खर्चुन संरक्षक भिंत बांधण्यात आली होती. ती देखील रस्त्यासोबत खचली असल्याने बांधकामाच्या दर्जावर संशय घेण्यात येत आहे.मुंबई, पालघर, नाशिक, डहाणू व सेलवास अश्या चारही दिशेने येणारी अवजड वाहने ही बायपास रस्त्याने वळविण्यात आली असून खबरदारी म्हणून पोलिसांनी खचलेल्या भागात बॅरिकेड्स व लाल रिबीन लावली आहे. शिवाय नाकाबंदी ठिकाणी देखील शहरात प्रवेश न करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. असे जव्हार पोलीस ठाणे चे पोलीस निरीक्षक संजयकुमार ब्राह्मणे यांनी सांगितले.

कोट्यवधींचा खर्च पाण्यात; संरक्षक भिंत कोसळल्याने बांधकामाच्या दर्जावर संशय.पावसामुळे पाचबत्ती परिसरातील मुख्यरस्ता खचला आहे, सुरक्षा म्हणून या भागात लाल रिबीन व बॅरिकेड्स लावण्यात आले आहे.नागरिकांनी या भागात फिरकू नये असे आवाहन देखील करण्यात आले आहे.ङ्ग''मानिनी कांबळे, मुख्याधिकारी, जव्हार नगर परिषद''.



# भारतातील टॉप-१० श्रीमंतांची नावे समोर; फोर्ब्स मासिकाने केली यादी जाहीर

आपल्या देशात कोण सर्वाधिक श्रीमंत आहे. हे जाणून घेण्याबाबत सर्वांनाच उत्सुकता असते. विशेष म्हणजे या श्रीमंतांबद्दल आणि त्यांच्या राहणीमानाबाबत अनेकांना आकर्षण असते.अशातच आता फोर्ब्स नुकतीच भारतातील श्रीमंताची नवी यादी जाहीर झाली आहे.

ज्यामुळे आता देशातील सर्वात श्रीमंत १० व्यक्ती कोण आहेत? याबाबतची ताजी माहिती सर्वसामान्यांना समजणार आहे.ही आहे देशातील टॉप-१० श्रीमंतांची यादी

१. मुकेश अंबानी : रिलायन्स इंडस्ट्रीजचे चेअरमन मुकेश अंबानी हे देशातील सर्वात श्रीमंत व्यक्ती आहे. मुकेश अंबानी यांचे नाव देशातील श्रीमंतांच्या यादीत पहिल्या क्रमांकावर आहे. त्यांच्याकडे एकूण १२४.२ बिलियन डॉलर्सची मालमत्ता आहे. जागतिक अब्जाधीशांच्या यादीत मुकेश अंबानी यांचे नाव ११ व्या क्रमांकावर आहे.

२. गौतम अदानी : अदानी समुहाचे अध्यक्ष गौतम अदानी हे देशातील दुसऱ्या क्रमांकाचे श्रीमंत व्यक्ती आहेत. जागतिक अब्जाधीशांच्या यादीत गौतम अदानी यांचे नाव २० व्या क्रमांकावर आहे. त्यांची एकूण मालमत्ता ८३.० बिलियन डॉलर्स इतकी आहे.३. सावित्री जिंदल : भारतातील श्रीमंतांच्या यादीत तिसरे नाव सावित्री जिंदल यांचे आहे. ओपी जिंदल ग्रुपच्या सर्वेसर्वा सावित्री जिंदल ७४ वर्षांच्या असून, त्यांची चार मुले



संपूर्ण बिझनेसचा व्याप सांभाळतात. सावित्री जिंदल यांची एकूण मालमत्ता ४१.८ बिलियन डॉलर्स आहे. जागतिक अब्जाधीशांच्या यादीत त्यांचा ३१ वा क्रमांक लागतो.मुकेश अंबानींच्या ड्रायव्हरचा पगार कितीये? तुम्हाला माहितीये का..? आकडा ऐकून अवाक व्हाल!४. शिव नादर : चे संस्थापक शिव नादर हे भारतातील चौथे आणि जगातील ४९ व्या क्रमांकाचे श्रीमंत व्यक्ती आहेत. शिव नादर यांच्याकडे ३४.१ बिलियन डॉलर्सची मालमत्ता आहे. विशेष म्हणजे सन २०२३ मध्ये शिव नादर यांनी २०४२ कोटी रुपये दान केले होते.५. दिलीप सांघवी : चे चेअरमन दिलीप सांघवी यांच्याकडे एकूण २५.८ बिलियन डॉलर्सची मालमत्ता आहे. दिलीप सांघवी हे भारतातील पाचव्या तर जगातील ७१ व्या क्रमांकाचे श्रीमंत व्यक्ती आहे.६. कुमार बिर्ला : आदित्य बिर्ला ग्रुपचे सर्वेसर्वा कुमार बिर्ला हे देशातील सहाव्या क्रमांकाचे श्रीमंत व्यक्ती आहे. कुमार बिर्ला यांच्याकडे एकूण २३.७ बिलियन डॉलर्सची मालमत्ता आहे. जागतिक अब्जाधीशांच्या यादीत बिर्ला त्यांचे नाव ८३ व्या क्रमांकावर आहे.७. सायरस पूनावाला : चे मालक सायरस पूनावाला हे भारतातील सातव्या क्रमांकाचे श्रीमंत व्यक्ती आहे. जगातील अब्जाधीशांच्या यादीत ८९ व्या क्रमांकावर सायरस पूनावाला यांचे नाव आहे. सायरस पूनावाला यांचे वय ८३ वर्षे असून, त्यांच्याकडे एकूण २२.४ बिलियन डॉलर्सची मालमत्ता आहे.८. राधाकिशन दमानी :

चे फाउंडर राधाकिशन दमानी हे ६९ वर्षांचे असून, त्यांच्याकडे २१.६ बिलियन डॉलर्सची मालमत्ता आहे. भारतातील श्रीमंतामध्ये राधाकिशन दमानी हे ८ व्या क्रमांकावर आहेत. जागतिक अब्जाधिशांच्या यादीत दमानी हे ९१ व्या क्रमांकावर आहेत. देशभरात त्यांचे ३३६ डी-मार्ट स्टोअर्स आहेत.९. कुशाल पाल सिंह : चे चेअरपर्सन कुशाल पाल सिंह हे भारतातील सर्वात अनुभवी बिझनेसमन आहेत. कुशाल पाल सिंह यांच्याकडे एकूण १८.६ बिलियन डॉलर्सची मालमत्ता आहे. कुशाल पाल सिंह हे भारतातील नवव्या तर जगातील १०२ व्या क्रमांकाचे श्रीमंत व्यक्ती आहे.

१०. रवी जयपुरिया : भारतातील अब्जाधीशांच्या यादीत चे चेअरमन आणि मालक रवी जयपुरीया हे १० व्या क्रमांकावर आहेत. रवी जयपुरीया यांच्याकडे एकूण १८.१ बिलियन डॉलर्सची मालमत्ता आहे. ते जगातील १०६ क्रमांकाचे अब्जाधीश व्यक्ती आहे.

# वडिलांमुळे झाली आयएएस, ओम बिर्ला यांच्या मुलीची उच्च न्यायालयात धाव

नवी दिल्ली, भारतीय रेल्वे वैयक्तिक सेवा (आईआरपीएस) अधिकारी आणि लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांची मुलगी अंजली बिर्ला यांनी दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. अंजीलने सोशल मीडियावर केल्या जाणाऱ्या दाव्याला आव्हान दिले आहे की, तिच्या वडिलांच्या प्रभावामुळेच ती यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण झाली आहे.

हायकोर्टाने या याचिकेवर जलद सुनावणी घेण्याचे मान्य केले.

ज्येष्ठ वकील राजीव नागर यांनी न्यायमूर्ती नवीन चावला यांच्यासमोर हा मुद्दा उपस्थित केला. या प्रकरणावर आजच सुनावणी होणार असल्याचे न्यायमूर्ती चावला यांनी सांगितले. बार आणि खंडपीठाच्या अहवालानुसार, बिर्ला यांनी याचिकेत म्हटले आहे की,

सोशल मीडियावर केल्या जात असलेल्या पोस्ट अपमानास्पद आणि खोट्या आहेत.



ओम बिर्ला यांची दुसऱ्यांदा लोकसभा अध्यक्षपदी निवड झाली आणि नीट यूजी पेपर लीकच्या वादात, अंजली बिर्ला तिच्या वडिलांच्या प्रभावशाली स्थानामुळे आईएएस अधिकारी झाल्याचा दावा करणाऱ्या काही पोस्ट सोशल मीडियावर केल्या गेल्या. अंजली ही व्यवसायाने मॉडेल असून तिच्या वडिलांमुळे ती पहिल्याच प्रयत्नात यूपीएससी परीक्षेत यशस्वी झाल्याचा दावा करण्यात आला.तथापि, अंजलीने हे दावे फेटाळले आणि सांगितले की हे सोशल मीडिया हँडल पूर्वनियोजित कटाचा भाग म्हणून चालवले जात आहेत. आपली आणि वडिलांची बदनामी करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप अजली यांनी केला. सोशल मीडियावर अंजली आयएएस अधिकारी असल्याचा दावा केला जात आहे, तर प्रत्यक्षात ती आयआरपीएस अधिकारी आहे. तिने २०१९ मध्ये यूपीएससी परीक्षा दिली होती.

# चारित्र्याच्या संशयावरुन पत्नीचा खून करून तो रात्रभर मृतदेहाशेजारी झोपला

पुणे : चारित्र्याच्या संशयावरुन पत्नीच्या डोक्यात कुऱ्हाडीने वार करून खून करण्यात आल्याची घटना नगर रस्त्यावरील लोणीकंद भागात घडली. पत्नीचा खून केल्यानंतर आरोपी रात्रभर पत्नीच्या मृतदेहाशेजारी झोपला होता. मंगळवारी आई कामावर आल्याने मुलीने दुपारी घरी जाऊन पाहिले. दारुचे व्यसन आहे. दारू पिऊन तो लक्ष्मीबाई यांच्याशी नेहमी वाद घालायाचा. लक्ष्मीबाई एका खासगी कंपनीत काम करत होत्या. त्यांची विवाहित मुलगी त्याच कंपनीत काम करत आहे. सोमवारी रात्री जाधव दाम्पत्यात पुन्हा वाद झाला.

बाबासाहेबने लक्ष्मीबाई यांच्या डोक्यात




तेव्हा हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला.लक्ष्मीबाई बाबासाहेब जाधव (वय ४४, रा. बुर्केगाव) असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे. याप्रकरणी पती बाबासाहेब मारुती जाधव (वय ५४) याला लोणीकंद पोलिसांनी मंगळवाारी सायंकाळी अटक केली. त्याच्याविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती लोणीकंद पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सावळाराम साळगावकर यांनी दिली.

जाधव कुटुंब नगर रस्ता परिसरातील बुर्के गावात राहायला आहे. महिनाभरापूर्वी जाधव दाम्पत्याचा मुलगा पेरणे फाटा परिसरात राहायला गेला. त्यांना एक मुलगी असून, ती विवाहित आहे. बाबासाहेबला कुऱ्हाडीने वार केला. गंभीर जखमी झालेल्या लक्ष्मीबाई यांचा मृत्यू झाला.

मंगळवारी सकाळी कंपनीतील कामगारांना नेण्यासाठी बस आली. लक्ष्मीबाई कामावर न आल्याने कामावरून सुटल्यानंतर मुलगी घरी गेली. तेव्हा आई लक्ष्मीबाई रक्ताच्या थारोळ्यात पडल्याचे उघडकीस आले. घाबरलेल्या मुलीने त्वरित या घटनेची माहिती दिली. पोलीस निरीक्षक साळगावकर आणि पथकाने घटनास्थळी धाव घेतली. आरोपी बाबासाहेब लक्ष्मीबाई यांच्या चारित्र्याचा संशय घेत होता. संशयातून त्याने त्यांचा खून केल्याची माहिती प्राथमिक चौकशीत मिळाली असल्याचे पोलीस निरीक्षक साळगावकर यांनी सांगितले.

## शाह, राजनाथ, शिवराज, गडकरी..! वाचा. अर्थसंकल्पात कोणत्या मंत्रालयाला मिळाला सर्वाधिक पैसा!

नवी दिल्ली : अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज (ता.२३) देशाचा अर्थसंकल्प सादर केला. विशेष म्हणजे अर्थसंकल्पात अनेक मोठ्या घोषणा करण्यात आल्या आहेत.प्रामुख्याने यावेळी गरीब, शेतकरी, महिला आणि तरुणांना केंद्रस्थानी ठेऊन अर्थसंकल्प सादर करण्यात आला. प्रत्येकवेळी प्रमाणे सर्वसाधारण अर्थसंकल्पाप्रमाणे महत्वाची खाती असलेल्या गृह, संरक्षण, कृषी, वाहतूक आणि दळणवळण या मंत्रालयांसाठी देखील मोठी आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. याच पार्श्वभूमीवर अमित शाह, राजनाथ सिंह, शिवराज सिंह चौहान, नितीन गडकरी यापैकी कोणत्या मंत्र्याच्या खात्याला सर्वाधिक पैसा मिळाला आहे. हे जाणून घेणार आहोत नितीन गडकरींच्या खात्याला मिळाला सर्वाधिक पैसा२०२४-२५ च्या अर्थसंकल्पात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाला सर्वाधिक पैसा मिळाला आहे. अर्थसंकल्पात परिवहन मंत्रालयासाठी तब्बल ५ लाख ४४ हजार १२८ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

## इन्कम टॅक्स रिटर्नसाठी उरले फक्त ८ दिवस

इन्कम टॅक्स रिटर्न फाइलिंगची डेडलाईन संपायला आता केवळ ८ दिवस उरले आहेत. जर ३१ जुलै २०२४ पर्यंत आयटीआर फाईल केली नाही तर करदात्याला दंड म्हणून मोठी रक्कम चुकवावी लागणार आहे. देशभरात आतापर्यंत १२ कोटींहून जास्त करदात्यांनी आयकर विभागाच्या पोर्टलवर जाऊन




आपली नोंदणी केली आहे.

तर आतापर्यंत ३ कोटी १० लाख टॅक्स रिटर्न फाईल करण्यात आल्या आहेत. ३१ जुलैपर्यंत इन्कम टॅक्स रिटर्न फाईल करणे निशुल्क आहे. परंतु त्यानंतर करदात्यांना दंड भरावा लागणार आहे. टेक्सपेयर्सचे वार्षिक उत्पन्न ५ लाखांपेक्षा जास्त असल्यास त्याला ५ हजार रुपये दंड द्यावा लागणार आहे.

